नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १५७ Issue - 157 | वार - सोमवार दि. २ नोव्हेंबर २०२६ Blow- Monday Date 2 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

पुणे, अहिल्यानगर, साताऱ्यात धुवांधार; राज्यात पावसाचा यलो अलर्ट

पुण्याच्या हिंजवडी परिसरात जोरदार पाऊस; अहिल्यानगर आणि साताऱ्यातही मुसळधार पाऊस, तीन दिवस राहणार हजेरी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुणे : महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली आहे. पुणे, अहिल्यानगर आणि सातारा या जिल्ह्यांमध्ये पावसाने दमदाट बॅटिंग केली आहे. मुसळधार पावसामुळे रस्ते जलमय झाले आहेत. अनेक ठिकाणी पाणी साचलं आहे. तसेच काही ठिकाणी वाहतूक देखील मंदावली. अचानक आलेल्या या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. दरम्यान, पावसामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे. तर या पावसामुळे काही ठिकाणी शेतकरी चिंतेत पडले आहेत. अचानक आलेल्या पावसामुळे हाता तोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. तर दुसरीकडे ऊस आणि ज्वारी पिकांसाठी हा पाऊस दिलासादायक असणार असल्याची चर्चा आहे.

पुण्याच्या हिंजवडी परिसरात जोरदार पाऊस पडला . अचानक आलेल्या पावसाने हिंजवडी परिसरातील नागरिकांची चांगलीच त्रेधातिरपीट झाली. मुसळधार आलेल्या पावसामुळे हिंजवडीत आयटी पार्क परिसरात रस्त्यांवर पाणी साचले. यामुळे रस्त्याने येजा करणाऱ्या नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागला.



पुण्यात अचानक आलेल्या पावसाने मेट्रो कामांबाबतही प्रश्न उपस्थित केले. शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रोचे सध्या काम सुरु असून लवकरच प्रवाशासाठी सुरु होणार आहे. पण उद्घाटनाआधीच शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रोच्या मान स्टेशनला गळती लागलेली बघायला मिळाली. येत्या ३ नोव्हेंबरला या मेट्रो लाईनचे उद्घाटन होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या मेट्रोचे उद्घाटन होणार आहे. पण त्याच्या दोन दिवसाआधीच मेट्रो स्थानकात मोठ्या प्रमाणात गळती होत असल्याचे व्हिडीओ समोर आले आहेत. मान मेट्रो स्थानकाच्या नव्या इमारतीत गळती लागल्याने बांधकाम ाबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

सातारा जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडला आहे. सातारा शहरासह ग्रामीण भागात पावसाने हजेरी लावली आहे. अचानक आलेल्या पावसामुळे अनेक भागांमध्ये पाणी साचलं. यासोबत रस्ते देखील जलमय झाले. याशिवाय अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड शहरातदेखील आज पावसाने हजेरी लावली. जामखेडमध्ये ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडला आहे.

बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ निर्माण झाले आहे. यामुळे महाराष्ट्राच्या वातावरणावर त्याचा परिणाम होताना दिसत आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये आज पाऊस पडल्यानंतर पुढच्या दोन ते तीन दिवसांमध्ये देखील पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, २ नोव्हेंबरला रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर जिल्हा आणि कोल्हापूर घाट परिसर, सातारा या जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाकडून या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या काळात वाऱ्याचा वेग हा ४० ते ५० किमी प्रतितास असण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाकडून वर्तवण्यात आलेल्या अंदाजानुसार, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, कोल्हापूर घाट परिसर, नांदेड, लातूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर ४ नोव्हेंबरसाठी कोल्हापूर जिल्हा, कोल्हापूर घाट परिसर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

शरद पवारांकडून दुष्काळी परिस्थितीचा आढावा; तुळशी गावात भेट; ५० लाखांची मदतही दिली

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी सोलापूर जिल्ह्यातून आपल्या दुष्काळ पाहणी दौऱ्याला सुरुवात केली. ज्या लोकसभा मतदारसंघातून त्यांनी लोकसभा निवडणूक लढवली होती, त्या माढा तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचा आज आढावा घेतला. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी येथील तुळशी गावातील शेतकऱ्यांनी गाव विकायला काढल्याचे बॅनर झळकावले होते, त्या गावातही शरद पवारांनी भेट दिलीय. त्यामुळे, माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार हे आज शेतकऱ्यांच्या बांधावर त्यांच्याशी संवाद साधताना दिसले.



सन १९७२ साली असाच दुष्काळ होता, तेव्हा मी सोलापूर जिल्ह्याचा पाकलमंत्री होतो. त्यामुळे, सरकारकडून शेतकऱ्यांना जमेल ती मदत त्याकाळी आम्ही केल्याची आठवण सांगत शरद पवारांनीही स्वत: देखील तुळशी गावातील पाणीटंचाई जाणून घेत थेट ५० लाख रुपयांची मदत देऊ केली. शरद पवारांनी सोलापूरच्या दुष्काळी परिस्थितीसाठी ५० लाखांच्या मदतीचा धनादेश खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्याकडे सुपूर्द केला. तसेच, राज्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी जेव्हा बारामतीमध्ये येतील तेव्हा खासदार सुप्रिया सुळे आणि खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांना शेतकऱ्यांच्या अडचणी मांडण्याबाबत वेळ देणार असल्याचंही शरद पवार यांनी म्हटलं. मराठवाड्याचा दुष्काळी दौरा झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांना भेटणार आहे. तर, एक महिन्यापूर्वीच आपण दुष्काळी परिस्थितीवर काय उपाययोजना करावी लागेल हे मुख्यमंत्र्यांना लेखी दिल्याचेही शरद पवारांनी सांगितले.

पवारांचा तुळशी ग्रामस्थांशी संवाद

दरम्यान, माढा तालुक्यातील 'तुळशी गाव विकणे आहे' असे पोस्टर ग्रामस्थांनी लावल्यामुळे हे गाव राज्यभर चर्चेत आले होते. गावातील भीषण दुष्काळी परिस्थिती आणि पाण्याच्या टंचाईकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी हे पोस्टर लावले. पाणीटंचाई आणि दुष्काळामुळे निर्माण झालेल्या संकटाची तीव्रता या माध्यमातून मांडण्यात आली होती. त्यानंतर, जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: गावाला भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला, शक्य ती मदत करण्याचे आश्वासन दिल्यानंतर तो बॅनर हटविण्यात आला होता.

त्यानंतर, आता खुद्द शरद पवारांनी आज तुळशी गावाला भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला, तसेच स्वत: मदत करताना सरकारकडेही मदतीसाठी चर्चा करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले.

दिल्लीत इंडिया आघाडीची अभूतपूर्व रॅली, तब्बल २० पक्ष एकवटले

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या आणि एसआयआरच्या (डखठ) निषेधार्थ इंडिया ब्लॉकने दिल्लीत अभूतपूर्व रॅली काढली. चार तास चाललेल्या या आंदोलनात २० विरोधी पक्षांनी सहभाग घेतला. डाव्या पक्षाचे नेते एम. ए. बेबी, तेजस्वी यादव, मल्लिकार्जुन खर्गे, अखिलेश यादव, ममता बॅनर्जी, फारुख अब्दुल्ला, मेहबूबा मुफ्ती आणि अखेरीस राहुल गांधी यांनी रामलीला मैदानावर भाषणे दिली. राहुल म्हणाले, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मतचोरीचा कट रचला आहे आणि त्यांना तुरुंगात जायलाच हवे. मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले, ते अंडरवर्ल्डमध्ये गेले तरी आम्ही त्यांना शोधून परत आणू. आम्ही त्यांना सोडणार नाही.



अखिलेश यादव यांनी उत्तर प्रदेशचा उल्लेख करत म्हटले की, जे एकदा उत्तर प्रदेशातून आले होते, ते आता उत्तर प्रदेशातूनच निघून जातील. जर उत्तर प्रदेशातील लोकांनी त्यांचे चांगले स्वागत केले, तर ते त्यांना चांगला निरोपही देतात. २०२७ मध्ये त्यांचे जाणे निश्चित आहे. गेल्या २५ दिवसांत विरोधी पक्ष या मुद्द्यावर एकत्र येण्याची ही सातवी वेळ होती. यापूर्वी, त्यांनी ६ ते १३ ऑक्टोबर दरम्यान सहा वेळा आंदोलन केले होते.

राहुल गांधी म्हणाले, ज्ञानेश कुमार यांना रात्री झोप लागत नाही. ते घाबरले आहेत. त्यांनी सर्वात मोठा गुन्हा केला आहे. त्यांनी राष्ट्राचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला, तो दडपून टाकला. ते पुढे म्हणाले, मोदी आणि शाह या दोघांनाही झोप लागत नाही. आम्ही वैरभाव बाळगणारे लोक नाही. आपल्याला द्वेष नाही, तर प्रेम पसरवायचे आहे. हे आंदोलन कोणत्याही एका पक्षासाठी, कोणत्याही एका नेत्यासाठी नाही. हे आंदोलन राष्ट्रासाठी आहे. हा राष्ट्राचा आवाज आहे, संविधान वाचवण्याचा आवाज आहे.

ते म्हणाले, मी तुम्हाला सांगतो, मोदी कुठेही जाऊ शकत नाहीत. जरी त्यांना जायचे असले तरी, आम्ही त्यांना जाऊ देणार नाही. ज्ञानेश कुमार यांच्यानंतर आम्ही तुमच्यासमोर उभे राहणार आहोत. तुमच्या मतचोरीविरोधात कायदेशीर कारवाई केली जाईल. देशाला न्याय मिळेल. राहुल पुढे म्हणाले, ज्यासाठी तुम्ही देश अदानींना विकला, त्याचा आम्ही बदला घेऊ. आम्ही तुम्हाला पळून जाऊ देणार नाही; तुम्ही इथेच राहाल. कारवाई केली जाईल. ते म्हणाले, आमच्यात आणि त्यांच्यात फरक आहे. हा देश द्वेषाचे ठिकाण नाही. आम्ही मोदी-शाह ज्ञानेश यांचा द्वेष करत नाही. आम्ही प्रेमाचे दुकान चालवणारे लोक आहोत. मोदी-ज्ञानेश यांनी देशाच्या आत्म्यावर, संविधानावर आणि लोकशाहीवर हल्ला केला आहे. आम्ही हे सहन करणार नाही.

राहुल गांधी म्हणाले, २०२४ च्या निवडणुकांनंतर १३.५ कोटी मतदारांना मतदार यादीतून वगळण्यात आले. प्रत्येक सात मतदारांपैकी एकाला वगळण्यात आले, म्हणजेच १५ टक्के मतदारांना यादीतून वगळण्यात आले. २०२४ मध्ये मतदानाची टक्केवारी केवळ ३ टक्के होती. याचा अर्थ २०२४ ची निवडणूक अवैध होती. हे मी म्हणत नाही; ही निवडणूक आयोगाची आकडेवारी आहे, जी हेच सांगत आहे. मी जे म्हणतो ते सत्य आहे. मी कोविडबद्दल जे बोललो, त्याचे सत्य समोर आले.

त्यांनी संपूर्ण देशाला जम्मू आणि काश्मीर बनवू नये

पीडीपी नेत्या मेहबूबा मुफ्ती म्हणाल्या की, आम्हाला या देशाच्या समस्या बदलायच्या आहेत, आम्हाला देश बदलायचा आहे. जर तुम्ही आज बदलले नाही, तर खूप उशीर होईल. २०१४पर्यंत सरकारांनी जी काही संपत्ती कमावली होती, ती सर्व व्यावसायिक मित्रांना देऊन टाकली. त्यांनी नोकऱ्यांचे आश्वासन दिले, पण ज्यांनी अभिमानाने सैन्यात सेवा केली, त्यांनाही अग्निवीर ठरवण्यात आले.

आपल्याला फक्त देवाची भीती बाळगायची आहे, त्यांची नाही

नॅशनल कॉन्फरन्सचे नेते फारुख अब्दुल्ला म्हणाले, ते सतत मुस्लिमांकडे बोट दाखवतात, (पान २ वर...)



संपादकीय....

केंद्राचा राज्यांना दिलासा

केंद्र सरकारनं देशातील सर्व राज्यांना दिवाळी गिफ्ट दिलं आहे. दिवाळीच्या आधी केंद्र सरकारने सर्व राज्यांना करपरतावा जारी केला आहे. केंद्र सरकारकडून मिळालेल्या या भांडवलीच्या पाठिंब्यामुळे विकासकामांना मोठी चालना मिळण्यासाठी केंद्र सरकारने राज्य सरकारांना या निधीचं वाटप केलं आहे. केंद्रानं राज्यांना एकूण १ लाख ०९ हजार कोटी रुपयांचा कर हस्तांतरण केलं. केंद्राच्या अर्थ मंत्रालयाकडून याबाबत माहिती देण्यात आली आहे. केंद्रानं महाराष्ट्र राज्याला ७०२२ कोटी कोटी रुपयांचा निधी देऊ केला आहे. दिवाळी सणाच्या पूर्वी केंद्र सरकारने राज्यांसाठी कर हस्तांतरणाचा आगाऊ हप्ता जारी केला आहे. केंद्र सरकारने देशातील सर्व राज्यांना जाहीर केलेल्या निधीमध्ये उत्तर प्रदेशला सर्वाधिक म्हणजेच १९,२०८ कोटी रुपये देऊ केले आहेत. यानंतर बिहारला १०,८४५ कोटी रुपये, मध्य प्रदेशला ८०१० कोटी रुपये आणि पश्चिम बंगालला ७८६६ कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. महाराष्ट्राच्या वाट्याला ७०२२ कोटी रुपये आले आहेत, तर राजस्थानला ६४६० कोटी रुपये आणि ओडिशाला ४८१९ कोटी रुपये मिळाले आहेत. केंद्र सरकारने सर्व राज्यांना देऊ केलेल्या ह्या निधीमुळे राज्याच्या आर्थिक गणिताला मोठी चालना मिळणार आहे. दक्षिण भारता-तील राज्यांसह देशातील इतर राज्यांनाही केंद्र सरकारने विकास कामांना गती देण्यासाठी निधी दिला आहे. दक्षिण भारतातील राज्यांचा विचार केला तर, आंध्र प्रदेशला ४५९७ कोटी रुपये, कर्नाटकला ४५०४ कोटी रुपये, तामिळनाडूला ४४६६ कोटी रुपये, तेलंगणाला २३७० कोटी रुपये आणि केरळला २५९७ कोटी रुपये निधी मिळाला आहे. पश्चिम भारतातील गुजरातला ४०९४ कोटी रुपये मिळाले आहेत, तर गोव्याला सर्वात कमी म्हणजे ३९८ कोटी रुपये निधी मिळाला आहे. मध्य आणि उत्तर भारतातील राज्याला छत्तीसगडला ३६०२ कोटी रुपये, हरियाणाला १४८४ कोटी रुपये, हिमाचल प्रदेशला ९९६ कोटी रुपये, झारखंडला ३६६० कोटी रुपये, पंजाबला २१७६ कोटी रुपये आणि उत्तराखंडला १२४४ कोटी रुपये मिळाले आहेत.

जैन समाजातील आर्थिक दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी शासन कटिबद्ध

मंत्री ॲड. आशिष शेलार; जैन समाजाने दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा : कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : जैन समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना स्वावलंबी बनविण्यासाठी शासनामार्फत व्याजमुक्त कर्ज, नवउद्योजकता आणि स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. तसेच जैन समाजाच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचे जतन व संवर्धन करण्यासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करण्यात येईल. प्राकृत, संस्कृत आणि मराठी साहित्याच्या देवाणघेवाणीसाठी कृत्रिम बुद्धिम त्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्यासही प्रोत्साहन देण्यात येईल, असे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले.

घाटकोपर येथील आर-ाध्य भक्ती पार्क येथे जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळाच्या वतीने आयोजित कर्ज वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा, महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी, प्रमुख संयोजक पराग शाह, महामंडळाचे समन्वयक संदीप भंडारी, जैन मुनी नम्र मुनी महाराज, साध्वी तसेच जैन समाजातील विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सांस्कृतिक कार्य मंत्री ड. शेलार म्हणाले की, जैन धम र्तील अहिंसा, जीवदया, समर्पण आणि विश्वकल्याणाची शिकवण समाजासाठी मार्गदर्शक आहे. जैन समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सक्षम करून त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. व्याजमुक्त कर्जाच्या माध्यमातून नवउद्योजकता, नावीन्यपूर्ण उद्योग आणि स्वयंरोजगाराला चालना देण्यात येईल. जैन समाजाच्या विविध मागण्यांचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडून त्यास मान्यता मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

राज्यातील जैन परंपरेशी संबंधित धार्मिक स्थळे, आध्यात्मिक केंद्रे आणि ऐतिहासिक वास्तूंचे जतन व संवर्धन करण्यासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करण्यात येईल. तसेच प्राकृत, संस्कृत आणि मराठी साहित्याच्या परस्पर देवाणघेवाणीला आणि साहित्यनिर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याबाबत प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.



कौशल्य, रोजग-ार, उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जैन समाजाने दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. समाजा-तील प्रत्येक व्यक्तीने किमान १०० रुपये मुख्यमंत्री सहायता निधीत जमा करून शासनाच्या मदतकार्यात सहभागी व्ह-ावे, असे त्यांनी सांगितले. जैन धर्माची परंपरा प्राचीन असून भारतीय संस्कृतीशी तिचे अतूट नाते आहे. व्यापक सांस्कृतिक एकात्मतेच्या भावनेतून समाजा-तील सर्व घटकांनी एकत्रितपणे वाटचाल करावी, असेही त्यांनी नमूद केले.

जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळामार्फत शिष्यवृत्ती, विधवा महिलांना व्यवसायासाठी अनुदान, पाठशाळांचे आधुनिकीकरण तसेच विहारधाम उभारणीसाठी प्रयत्न करण्यात येत असल्याची माहिती महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली. यावेळी अखिल भारतीय जैन अल्पसंख्याक महासंघाच्या वतीने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी ५१ लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा त्यांनी केली.

५११ लाभार्थ्यांना ५१ कोटी रुपयांचे कर्जवाटप

कार्यक्रमात शेठ वालचंद हिराचंद स्वयंरोजगार कर्ज व्याज परतावा योजना, कर्मवीर भाऊराव पाटील उच्च शिक्षण कर्ज योजना आणि महिला बचत गट कर्ज योजना या तीन योजना अंतर्गत प्रातिनिधिक स्वरूपात सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांच्या हस्ते लाभार्थ्यांना कर्जवितरणाचे धनादेश प्रदान करण्यात आले. या योजनांच्या पहिल्या टप्प्यात एकूण ५११ लाभार्थ्यांना ५१ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले.

महामंडळाचे समन्वयक संदीप भंडारी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. यावेळी जैन मुनी नम्र मुनी म हाराज, जैन साध्वी तसेच अन्य मुनींनी उपस्थितांना आशीर्वचन दिले. समाजातील विविध संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

घोटी जनता विद्यालयात सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व स्व. इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

घोटी/प्रतिनिधी :- मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलित घोटी येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली .

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य कैलास आहेर होते. व्यासपीठावर चारूशीला तागडे, हेमंत झोले, निवृत्ती सरगर, कैलास पाच-ोरे, अर्पणा उईके, अविनाश निकम, संपत शेंगाळ, गायत्री सूर्यवंशी, प्रकाश तांबे, सत्येन जाधव, मंगेश कासार, प्रा. स्वाती जगताप, मुख्यलिपीक रावसाहेब रणशेवरे, वरिष्ठ लिपिक जीवन शिंदे, अनिल गोवर्धने आदी उप-स्थित होते. उपस्थितीतांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

सोमनाथ गिरी व उज्वला देवरे यांनी सरदार वल्लभभाई पटेल व इंदिराजी गांधी यांच्या कार्याची ओळख करून दिली.

अध्यक्ष स्थानावरून बोल-ताना प्राचार्य कैलास आहेर म्हणाले की, सरदार वल्लभभाई पटेल यांना पोलादी पुरुष म्हणून ओळखले जाते. संस्थानिकांच्या विलीनीकरणासाठी त्यांनी पुढाकार घेतला. तसेच भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून तसेच इंदिराजी गांधी यांनी केलेले कार्य अतिशय महान व देशाला एक संघ करण्यासाठी व प्रगतीपथावर नेण्यासाठी महत्त्वाचे आहे . दोन्हीही विभुतींचे महान कार्य आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ गिरी यांनी तर आभार रमेश देवगिरे यांनी मानले. यावेळी सर्व शिक्षक,शिक्षिका व शिक्षकेत्तर सेवक उपस्थित होते.

दिल्लीत इंडिया आघाडीची अभूतपूर्व रॅली, तब्बल २० पक्ष एकवटले

(पान १ वरून..)

हे सांगण्यासाठी आम्ही येथे जमलो आहोत. ते म्हणतात की ते पाकिस्तानी आहेत. मला भाजपला सांगायचे आहे की आम्ही भारतासाठी आमचे रक्त दिले आहे आणि यापुढेही देत राहू. आम्हाला या देशात राहायचे आहे.

ममता बॅनर्जी म्हणाल्या, आम्ही जाणार नाही, आम्ही आमचा जीव देऊ, आम्ही लढू. आमचा बंगाल लुटला गेला आहे. आम्ही लोकशाही वाचवू. लोकशाही लुटली गेली आहे, हक्क लुटले गेले आहेत, मतम ोजणी लुटली गेली आहे. तुम्ही केवळ मतंच नाही, तर संपूर्ण मतमोजणीच गायब केली आहे. आम्ही हरलेलो नाही, आम्हाला हरवलं आहे.

अखिलेश म्हणाले, जे एकदा उत्तर प्रद-ेशातून आले होते, ते आता उत्तर प्रदेशातून जातील. जर उत्तर प्रदेशातील लोकांनी तुमचे चांगले स्वागत केले, तर ते तुम्हाला चांगला निरोपही देतात. २०२७ मधील प्रस्थान निश्चित आहे. ही प्रभू रामाच्या खेळाची भूमी आहे. जे पापी आहेत त्यांचा नाश होईल. प्रभू रामाच्या उपस्थितीत त्या पापींना सोडले जाणार नाही. ज्यांनी देणग्या आणि अर्पण चोरले आहेत, त्यांचा नाश होणार नाही, तर त्यांचा संपूर्ण नायनाट केला जाईल.

खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्रशालेच्या दोन खेळाडूंची राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

हनुमंत पाटुळे /खामसवाडी

जिल्हा परिषद प्रशाला खाम सवाडी येथील कबड्डी खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

राज्य असोसिएशन कबड्डी स्पर्धेसाठी गेलेल्या प्रशालेतील खेळाडूंपैकी दोन विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी धाराशिव जिल्हा संघात निवड झाली आहे.

मुलांच्या किशोरवयीन गटातून शिवम नितीन हिरे याची, तर मुलींच्या किशोरी वयोगटातून अदिती अनिल डोईफोडे हिची जिल्हा संघात निवड झाली आहे. दोन्ही खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर ही यशस्वी कामगिरी केली आहे.

या निवडीमुळे प्रशालेच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेतील इतर खेळाडूंनाही प्रेरणा मिळणार आहे.



या यशाबद्दल विद्यार्थ्यांना व मार्गदर्शक शिक्षक गणेश करंजकर यांना प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. रामचंद्र पवार शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

शिक्षण महर्षी स्व.देवानंद भाऊ कायंदे यांच्या जयंती निमित्त भव्य मोफत महाआरोग्य शिबिर उत्साहात संपन्न





दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : शिक्षणमहर्षी स्व. देवानंदभाऊ कायंदे यांच्या जयंतीनिमित्त देऊळगाव राजा येथील समर्थ शैक्षणिक संकुलात एका भव्य मोफत महाआरोग्य व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, हा उपक्रम मोठ्या उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडला.

आरोग्य तपासणी: या महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून तब्बल ८,७७३ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली आणि त्यांना योग्य तो वैद्यकीय सल्ला व औषधोपचार देण्यात आले.

रक्तदान: सामाजिक बांधिलकी जपत परिसरातील १७३ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून या मानवतावादी उपक्रमात मोलाचा सहभाग नोंदवला.

मान्यवरांच्या उपस्थितीत दिमाखदार उद्घाटन:

शिबिराचे उद्घाटन श्री गजानन महाराज कृषी व शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षा तथा मा. जिल्हा परिषद अध्यक्षा, आदरणीय सौ. नंदाताई देवानंद कायंदे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित मान्यवर, स्थानिक लोकप्रतिनिधी, सेवाभावी डॉक्टर, आरोग्य कर्मचारी तसेच शेकडो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्व. देवानंदभाऊंच्या विचारांचा वारसा:

या प्रसंगी बोलताना आयोजकांनी सांगितले की, स्व. देवानंदभाऊंच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सेवाभावी विचारांचा वारसा पुढे चालवत, समाजा-तील शेवटच्या घटकापर्यंत मोफत व उत्तम आरोग्यसेवा पोहोचवणे हाच आम चा प्रामाणिक प्रयत्न आहे. भाऊंच्या जयंतीनिमित्त असा समाजोपयोगी उपक्रम राबवणे हीच त्यांना खऱ्या अर्थाने आदरांजली ठरेल.

या महाआरोग्य व रक्तदान शिबिराच्या यशस्वितेसाठी अहोरात्र परिश्रम घेणारे सर्व तज्ज्ञ डॉक्टर, कुशल आरोग्य कर्मचारी, रक्तदाते, शिबिर आयोजक आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सहकार्य करणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे आयोजकांच्या वतीने मना-पासून आभार मानण्यात आले.

कर्तव्यनिष्ठ माजी सैनिक कुष्णात तातोबा पाटील यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन; सैनिक टाकळीत सोमवारी रक्षाविसर्जन कार्यक्रम

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



सैनिक टाकळी : देशसेवेचे व्रत स्वीकारून भारतीय सैन्यात कर्तव्य बजावल्यानंतर गावा-तील आजी-माजी सैनिकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आयुष्यभर झटणारे सैनिक टाकळी येथील कर्तव्यनिष्ठ माजी सैनिक कुष्णात तातोबा पाटील यांचे शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने सैनिक टाकळी परिसरातील आजी-माजी सैनिक परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

कुष्णात तातोबा पाटील यांनी माजी सैनिक तसेच सैनिक समाज कल्याण मंडळाचे माजी सचिव म्हणून अत्यंत निष्ठेने आणि समर्पित भावनेने कार्य केले. गावातील आजी-माजी सैनिकांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी ते नेहमीच तत्पर असायचे. सैनिकांच्या समस्या, त्यांच्या कुटुंबीयांचे प्रश्न तसेच सामाजिक कार्य असो, प्रत्येक वेळी ते खंबीरपणे सर्वांच्या पाठीशी उभे राहत होते.

सैनिक बांधवांसाठी ते केवळ एक व्यक्ती नव्हते, तर एक आधारवड होते. त्यांच्या निधनामुळे सैनिक संघटनेने एक निष्ठावंत, कर्तव्यदक्ष आणि समाजासाठी सदैव तत्पर असलेला सहकारी गमावला आहे.

त्यांनी केलेले सामाजिक कार्य, सैनिकांप्रती असलेली तळमळ आणि समाजासाठी दिलेले योगदान सदैव स्मरणात राहील.

त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ठीक ९ वाजता सैनिक टाकळी येथील वैकुंठधाम येथे रक्षाविसर्जन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

विठ्ठल कारखान्याने पहिल्या उचलची कोंडी फोडली: जिल्ह्यातील सर्वाधिक दर ३१०१ रुपयाची घोषणा

आमदार अभिजीत पाटील यांचा शेतकऱ्यांना दिलासा; सुपारी बाज आंदोलन मागे पडण्याची शक्यता

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क
प्रतिनिधी/पंढरपूर

पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा राजवाडा म्हणून ओळखला जाणारा श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याने अखेर ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या पहिल्या उचलीबाबत महत्वपूर्ण घोषणा केली आहे.

कारखान्याचे चेअरमन तथा आम दार अभिजीत पाटील यांनी यंदाच्या गळीत हंगामासाठी प्रति टन ३१०१ रुपये पहिली उचल देण्याची जाहीर केले आहे. या निर्णयामुळे जिल्ह्या-तील चर्चेला नवे वळण मिळाले आहे. शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. गेल्या



काही दिवसापासून आंदोलन सुरू असून आंदोलनाची धार कमी झालेली आहे. आंदोलन संपुष्टात येणार का या बाबतीत चर्चा सुरू आहे.

यंदाच्या वेळी हंगामामध्ये पहिली उचल किती द्यायची यामध्ये साखर कारखाना आणि शेतकरी संघटनांमध्ये संघर्ष सुरू आहे. काही कारखान्यांनी ठराविक कारखान्यांना लक्ष करून आंदोलन सुरू केले आहे. काही कारखान्याची गाळप बंद पाडण्याची चित्र दिसत आहे

पार्श्वभूमी विठ्ठल सहकारी साखर कारखाने पहिली उचल ३१०१ रुपये दर देऊन ऊस दराच्या प्रश्नावर पुढाकार घेतला आहे.

सोलापूर जिल्ह्यात पूर्वी प्राध्यापक सावंत सर यांनी प्रति टन ३१०१ त्यानंतर विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाने प्रति टन ३००० जाहीर केला आहे. आम दार अभिजीत पाटील यांच्या विठ्ठल सहकारी साखर कारखान्याने ३१०१ प्रति टन पहिली उचल देण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात विठ्ठल कारखान्याने आघाडी घेतल्याचे चित्र दिसत आहे.

गेले काही दिवसापासून शेतकरी संघटनांनी रोज दाराच्या बाबतीत आक्रमक भूमिका घेतली होती. ठराविक कारखान्या लक्ष करून गाळप बंद पाडण्याची आरोप विठ्ठल सहकारी कारखान्याचे संचालकानी केला होता. काही संघटना इतर कारखान्याच्या सांगण्यावरून आंदोलन करत असल्याचा आरोपी संचालकाने केला.

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांचा बँक निवडणुकीसाठी साधेपणाने अर्ज दाखल



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क
प्रतिनिधी/पंढरपूर

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी सांगोला तालुक्याचे आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल करताना कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव अत्यंत साधेपणाने दाखल केला यावेळी असंख्य जेष्ठ तरुण कार्यकर्त्यांनी उप-स्थिती लावली होती.

आमदार डॉक्टर देशमुख यांनी कार्यकर्त्यांच्या प्रेमापोटी कोणताही गादा वादा न करता साध्या पद्धतीने आपला अर्ज दाखल केला असून त्यांच्या या साध्या कोणाचे सर्वत्र कौतुक होत आहे. एवढी जिल्हा परिषद सदस्य मोहन बापू आमदार, सभापती रमेश जाधव युवा नेते नंदकुमार शिंदे, संगम आप्पा धांडोरे बाळासाहेब पाटील, प्राचार्य विजयकुमार वाघमोडे, समाधान पवार, शिवाजीराव शेजाळ सर, पंचायत समिती माजी सदस्य आनंदराव सरगर, सोशल महिमा कोर कमिटीचे सदस्य चंद्रकांत सरतापे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार डॉक्टर देशमुख यांचा अर्ज दाखल होताच कार्यकर्त्यांमध्ये जल्लोषाचे वा-तावरण निर्माण झाले. असून बँकेच्या माध्यमातून शेतकरी व सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



मागील ३८ वर्षाची अखंडित सेवा कायम

विठ्ठल मंदिरात संत कैकाडी बाबांच्या पुण्यतिथी निमित्त संत तुकाराम गाथा पारायण

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क
पंढरपूर /प्रतिनिधी

पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या सभा मंडपामध्ये संत तुकाराम म हाराज गाथा पारायणाची मागील ३८ वर्षाची परंपरा कायम जपली जात आहे. हा सोहळा संत कैकाडी बाबांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित करण्यात येत असतो. यावर्षीही हा सोहळा मोठ्या उत्साहात सुरू झाला आहे. त्यामध्ये दिवसभर विविध सांप्रदायिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

समता, बंधुता, शांतता हा संताचा संदेश देण्याचे प्रेरित कार्य सुरू

हा सप्ताह २६ऑक्टोबर पासून सुरु करण्यात आला असून, याची सांगता ३नोव्हेंबर रोजी होणार आहे असल्याची माहिती आयोजक आणि वै. ह भ प रामदास महाराज जाधव यांचे चिरंजीव भारत जाधव यांनी दिली आहे.

या कार्यक्रमाचे माध्यमातून समता बंधुता शांतता नांदावी असा संदेश देण्याचे संतांचे प्रेरित काम संत कैकाडी बाबांच्या माध्यमातून केले जात आहे. या सोहळ्यासाठी राजकीय धार्मिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आवर्जून भेट दिली आहे.

या आयोजित करण्यात आलेल्या गाथा पारायण सोहळ्याच्या ठिकाणी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे अध्यक्ष गहिनीनाथ म हाराज औसेकर, सदस्य जळगावकर महाराज, पंढरपूर मर्चंट बँकेचे माजी चेअरमन अमरजीत पाटील, युवा नेते प्रणव परिचारक, संदीप मांडवे, नगरसेवक गणेशदादा शिंदे नाईक, जनसेवा संघटनेचे संग्राम जाधव, नगरसेवक किरणराज घाडगे, मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीण गम, पंढरपूर शहर संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष खटके, सागरदादा यादव, सचिन आदमीले ,राजेंद्र डुबल, राजेश बदले पाटील, बाळासो बागल ,बागल, महाराज गादेगाव, राहुल जाधव सर, रवींद्र गायकवाड, सत्यवान गायकवाड, नितीन यादव, राहुल म ने ,शशिकांत जाधव, बबन माने सुरेश माने, महादेव माने, अमोल माने, माजी नगरसेवक कृष्णा वाघमारे, शैलेश आगावणे राहुल गावडे ,सुरज पेंडल यासह एक क्षेत्रातील मान्यवरांनी भेटी दिल्या आहेत.

आनंदाचा शिधा' पुन्हा सुरू करा, उत्पन्नाची मर्यादा वाढवा; ई-केवायसी प्रक्रिया विनामूल्य करण्याची मागणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क
मुंबई (केतन भोज) : महाराष्ट्रातील दुष्काळसदृश परिस्थिती, वाढती महागाई आणि सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक अडचणी लक्षात घेता जनतेला दिलासा मिळावा, यासाठी शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाच्या वतीने महत्त्वपूर्ण मागण्या करण्यात आल्या आहेत.

शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे सरचिटणीस निखिल सावंत यांनी रेशनिंग नियंत्रक श्री. चंद्रकांत डांगे यांची भेट घेऊन सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या विविध प्रश्नांवर चर्चा केली. यावेळी प्रामुख्याने तीन महत्त्वाच्या मागण्या शासनाकडे मांडण्यात आल्या.

यामध्ये आगामी दिवाळीच्या पार्श्वभूम ीवर गरजू नागरिकांसाठी 'आनंदाचा शिधा'



योजना पुन्हा सुरू करण्यात यावी, सध्या लागू असलेली वार्षिक ६० हजार रुपयांची उत्पन्न मर्यादा वाढवून ती किमान १ लाख ३० हजार ते २ लाख रुपयांपर्यंत करण्यात यावी, तसेच यासंदर्भातील शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच रेशनकार्डधारकांना ई-केवायसी प्रक्रियेदरम्यान होणारा आर्थिक व मानसिक त्रास थांबवून ही प्रक्रिया पूर्णपणे विनामूल्य, सुलभ आणि नागरिकांना सहज उपलब्ध होईल अशा पद्धतीने राबविण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली.

या सर्व मागण्यांवर रेशनिंग नियंत्रक श्री. चंद्रकांत डांगे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. या शिष्टमंडळात कार्यकारिणी सदस्य बबन सकपाळ, कक्ष प्रमुख विजय पवार, कक्ष विधानसभा संघटक किरण काळे, कृष्णकांत शिंदे, बळीराम मोसमकर, ड. हर्षल साळवी, यशवंत खोपकर, समीर हडकर आणि शेखर यादव उपस्थित होते.

सर्वसामान्य रेशनकार्डधारकांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाने घेतलेला हा पुढाकार नागरिकांसाठी दिलासादायक ठरणार आहे.



उल्हासनगर स्टेशन पूर्व येथे स्कायवॉकचा लोखंडी पत्रा कोसळला; रिक्षाचालक व दुचाकीस्वार जखमी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क
प्रतिनिधी/ बाळासाहेब अहिरे

उल्हासनगर : उल्हासनगर रेल्वे स्टेशन पूर्व परिसरात स्कायवॉकचा लोखंडी पत्रा अचानक कोसळल्याने रिक्षाचालक आणि दुचाकीस्वार जखमी झाल्याची घटना घडली. या दुर्घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. स्कायवॉकच्या देखभालीकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी म हानगरपालिका व संबंधित विभागाने तातडीने स्कायवॉकची पाहणी करून धोकादायक भागांची दुरुस्ती करावी आणि या घटनेची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

प्रभाग १७ मधील नागरिकांना मनसेने ते दिलीप धोत्रे यांच्याकडून दिवाळी किटचे वाटप



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क
प्रतिनिधी/पंढरपूर : दिवाळी साजरी करण्यासाठी श्रीमंताप्रमाणे गोरगरिबांना ही कोणतीही अडचण येऊ नये उत्सव आनंदात सण साजरा करण्यासाठी यांच्या या सामाजिक भावनेतून मशीन येथे दिलीप बापू धोत्रे यांच्या वतीने पंढरपूर शहरातील प्रभाग क्रमांक १७ यातील सर्व नागरिकांना दिवाळी कीडचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाद्वारे प्रभागातील दिवाळी अधिक गोड होणार असून, धोत्रे यांच्या सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या दिवाळी किटमध्ये, साखर, रवा, मैदा, गोडेतेल, डालडा चकली पीठ, मोती साबण उठणे सुगंधी तेल, मीठ खोबरे, डाळी शेंगदाणे चुरमुरे, पोहे, फटाके आधी दिवाळीसाठी लागणाऱ्या साहित्यांचा समावेश आहे.

यावेळी नगरसेविका मधुरताई धोत्रे ,नगरस-ेवक लंकेश यादव, मनसेचे शहर संघटक गणेश पिंपळनेर, पिंटू गायकवाड, दादा घोडके, दिनेश पांढरे, दादा क्षीरसागर, जगदीश लकेरी, बापू खिलारे, संतोष सर्व गोड, नाता यादव प्रसाद यादव लाला पेंटर, शफी मुलांनी जमीर सय्यद, विवेक शिंदे बाळू देवमारे भोलासाठे, राजू वाघमारे नागेश इंगोले, भावड्या माने धनाजी सुरवसे, दत्ता कटके, सोमा काटे, पप्पू बनपट्टे, गायकवाड आधी जण उपस्थित होते.

सध्या दुष्काळी परिस्थिती असताना रिंग काढून सहन करण्याची वेळ येऊ नये आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही कुटुंबाचा दिवाळीचा सण व त्याचा आनंद हिरावला जाऊ नये गोर-गरीब नागरिकांना ही श्रीमंत प्रमाणे दिवाळी साजरी करण्यात यावी, या उद्देशाने प्रभागातील नागरिकांना दिवाळीसाठी लागणारा सर्व किराणाम ाल साहित्य भेट देण्यात आले.
– मनसे नेते दिलीप धोत्रे

धैर्यशील मोहिते पाटील व संजयमामा शिंदे आंदोलनात सहभागी

उजनीच्या पाण्यासाठी राजकीय विरोधक एकत्र





दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क
प्रतिनिधी/पंढरपूर

उजनी धरणाच्या प्रस्तावित एआयनेटा सेंटर व ऊर्जा प्रकल्पाच्या मुद्द्यावरून सोलापूर जिल्ह्यात राजकीय वाता-वरण तापले आहे. शेतकरी मच्छीमार व स्थानिक नागरिकांनी या प्रकल्पांना विरोध दर्शवला आहे त्यांच्या आंदोलनात राजकीय पाठबळ दिसत आहे. विशेष म्हणजे राजकीय विरोध म्हणून एकम ेकाला ओळखली जाणारे माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील, व करमाळा तालुक्याचे माजी आमदार संजय मामा शिंदे, हे उजनीच्या प्रश्नावर एकत्र आले आहेत ३१ ऑक्टोबरला हिंगण-गाव पुलावर झालेले आंदोलनात आमदार रोहित पवार सह अनेक नेते यांनी सहभाग घेतला आहे.

पाण्याचा वापर हा आंदोलनाचा केंद्रबिंदू आहे उजनी धरणाची निर्मिती शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी गरज पूर्ण करण्यासाठी करण्यात आले आहे. मात्र धरण परिसरातील अनेक गावांना आजही पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत मोठा पाणीसाठा लागणाऱ्या डेटा सेंटर प्रकल्पासाठी पाणी कुठून उपलब्ध होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

शेतकरी मच्छिमार आणि पर्यावरणाबाबत चिंता प्रकल्प मध्ये पाण्याची व वीजपुरवठा स्थानिक रोजगार ध्वनी प्रदूषण, जैवविविधतेवर परिणाम होण्याची भीती, आंदोलक व्यक्त करत आहेत. कारण त्या सौरऊर्जा प्रकल्पामुळे मच्छीमारांच्या व्यवसायावर परिणाम होऊ शकतो. अशी चिंता व्यक्त होत आहे.

राजकीय मतभेद सोडून जिल्ह्यातील प्रश्नावर एकत्रित भूमिका,?

आंदोलनामुळे सोलापूर जिल्ह्यातील राजकीय समीकरणामुळे चर्चेला विषय मि ळाला आहे. मात्र ही एक दूध किती वेळ टिकते , प्रशासन कारणीने घेतो, आणि शेतकऱ्यांच्या मागण्यावर काय तोडगा निघतो हे पुढील काळात स्पष्ट होईल,

खाकी वर्दीचा माज की कायद्याचा धाक संपला? पत्रकार प्रिया खंडागळे यांच्यावरील हल्ल्याने पोलीस खात्यावर प्रश्नचिन्ह!

संबंधित महिला पोलीस कर्मचाऱ्याची गडचिरोलीला बदली करा; पत्रकाराची जाहीर माफी मागावी; डॉ. विश्वासराव आरोटे यांची आक्रमक मागणी; अन्यथा राज्यभर आंदोलनाचा इशारा!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



नवी मुंबई/प्रतिनिधी : लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रकारितेवर दिवसेंदिवस हल्ल्यांचे प्रमाण वाढत असून, आता पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. राजकीय व्यक्तींकडून पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांनंतर आता पोलीस यंत्रणेतील काही कर्मचाऱ्यांकडूनही पत्रकारांना मारहाण होण्याच्या घटना समोर येत असल्याने लोकशाही व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नवी मुंबई येथील महिला पत्रकार प्रिया खंडागळे यांच्याशी संबंधित मारहाणीच्या कथित घटनेचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आहे. संबंधित महिला पोलीस कर्मचाऱ्याची तातडीने गडचिरोली येथे बदली करावी, पत्रकाराची जाहीर माफी मागावी आणि गृह विभागाने या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशी आक्रमक मागणी त्यांनी केली आहे.

यावेळी बोलताना डॉ. आरोटे म्हणाले की, बाळशास्त्री जांभेकर, लोकमान्य टिळक यांच्यासारख्या थोर पत्रकारांनी पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेचे प्रश्न शासनदरबारी मांडण्याची परंपरा निर्माण केली. पत्रकारिता ही कोणाचे जीवन उद्ध्वस्त करण्यासाठी नसून समाजातील चुकीच्या गोष्टींवर प्रकाश टाकून अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी आहे. त्यामुळे पत्रकार हा समाज आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. पोलीस, वकील आणि पत्रकार ही लोकशाही व्यवस्थेतील महत्त्वाची क्षेत्रे असून, या तिन्ही घटकांबद्दल सर्वसामान्य जनतेच्या मनात आदर आहे. पोलीस आणि पत्रकार हे समाजहितासाठी एकमेकांना पूरक आहेत. अनेक गुन्ह्यांच्या तपासात पत्रकारितेतून समोर येणाऱ्या माहितीचा पोलिसांनाही उपयोग होतो. मात्र, अशा परिस्थितीत पत्रकारांनाच मारहाण केली जात असेल तर ही बाब अत्यंत गंभीर आहे.

नवी मुंबई परिसरात सुरू असलेल्या कथित कुंटणखान्यांच्या व्यवसायाबाबत स्थानिक ग्रामस्थांच्या मागणीवरून पत्रकार प्रिया खंडागळे यांनी वृत्त प्रसिद्ध केले होते. संबंधित परिसराची बदनामी होऊ नये आणि तेथील अवैध व्यवसाय बंद व्हावेत, अशी स्थानिक नागरिकांची भूमिका असल्याचे या वृत्तातून मांडण्यात आले होते. मात्र, या वृत्ताच्या पार्श्वभूमीवर संबंधित महिला पोलीस अधिकाऱ्याकडून पत्रकार तरुणीला मारहाण झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. पत्रकाराने प्रसिद्ध केलेल्या वृत्ताबाबत आक्षेप असल्यास कायदेशीर मार्गाने आपली बाजू मांडता आली असती; परंतु मारहाण करणे हा कोणत्याही परिस्थितीत पर्याय होऊ शकत नाही, असे डॉ. आरोटे यांनी स्पष्ट केले.

पत्रकार असल्याचे माहीत असूनही मारहाण करणे आणि त्यानंतर माफी मागून प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न करणे, हा प्रकार थांबला पाहिजे. आधी मारहाण करायची आणि नंतर माफी मागायची, असा प्रकार लोकशाहीत खपवून घेतला जाणार नाही. दिल्लीतील आंदोलनादरम्यानही महिला पत्रकाराला मारहाण झाल्याची घटना समोर आली होती. आता महाराष्ट्रातही अशा घटना घडत असतील तर पत्रकारांनी निर्भयपणे काम कसे करायचे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी. संबंधित महिला पोलीस कर्मचाऱ्याची तातडीने गडचिरोली येथे बदली करावी, तिच्यावरील आरोपांची निष्पक्ष चौकशी करावी आणि पत्रकार प्रिया खंडागळे यांची जाहीर माफी मागण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी डॉ. आरोटे यांनी केली. यासंदर्भात राज्य पत्रकार संघाच्या वतीने गृह विभागाकडे निवेदन देण्यात आले असून, ठाणे पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकारी तसेच पोलीस महासंचालक स्तरावरही या विषयाकडे लक्ष वेधण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

पत्रकारितेच्या माध्यमातून कुंटणखान्यांसारख्या अवैध व्यवसायांवर आवाज उठवला जात असेल तर अशा व्यवसायांवर कारवाई करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. या व्यवसायांना कोणाचे राजकीय पाठबळ आहे का, त्यातून कोणाचे हितसंबंध गुंतले आहेत का, याचीही चौकशी झाली पाहिजे. अवैध व्यवसायांकडे दुर्लक्ष करून त्याविरोधात आवाज उठवणाऱ्या पत्रकारांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न होत असेल तर तो सहन केला जाणार नाही. पत्रकारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी दादागिरी आणि मारहाणीचा मार्ग स्वीकारणे ही कायद्याच्या राज्याला शोभणारी बाब नाही, असेही त्यांनी ठणकावून सांगितले. पत्रकार प्रिया खंडागळे या धाडसी महिला पत्रकार असून, त्यांनी समाजहिताचा विषय मांडल्याबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येत असल्याचे डॉ. आरोटे यांनी नमूद केले. पत्रकार कोणत्याही राजकीय पक्षाच्या आधारावर काम करत नाहीत. सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न, अन्याय, भ्रष्टाचार आणि समाजातील चुकीच्या प्रवृत्ती यांना वाचा फोडणे हेच पत्रकारांचे कर्तव्य आहे. पाकिट पत्रकारिता न करता दिवसभर आपल्या दैनंदिन जबाबदाऱ्या सांभाळून जनतेच्या प्रश्नांसाठी काम करणारे असंख्य पत्रकार राज्यात कार्यरत आहेत. अशा पत्रकारांना संरक्षण मिळण्याऐवजी त्यांच्यावर हल्ले होत असतील तर ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.

पत्रकारांच्या संयमाचा अंत पाहू नका!

पत्रकार प्रिया खंडागळे यांच्यावरील हल्ल्याच्या आरोपांची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. संबंधित महिला पोलीस कर्मचाऱ्याची बदली करून पत्रकाराची माफी मागण्यात यावी. अन्यथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा डॉ. विश्वासराव आरोटे यांनी दिला. दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळातही जनतेच्या सुरक्षेसाठी आणि समाजहितासाठी काम करणाऱ्या पत्रकारांनाच रस्त्यावर उतरावे लागले तर ही प्रशासनासाठी चिंतेची बाब ठरेल. पत्रकार पोलिसांना सहकार्य करतात; मात्र पत्रकारांच्या सन्मानाचा आणि सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्यास तेही अन्यायाविरोधात रस्त्यावर उतरतील. पत्रकारितेचा आवाज दडपण्याचा प्रयत्न कोणीही करू नये, कारण हा आवाज कोण्या एका व्यक्तीचा नसून सर्वसामान्य जनतेच्या न्याय्य हक्कांचा आहे, असा ठाम इशाराही त्यांनी दिला.

रिपाइं(आठवले)च्या माध्यमातून बाबू शेठ कांबळे यांच्या वतीने लोकांना दिवाळी फराळाचे साहित्य वाटप करणे हे काळाची गरज व स्तुत्य उपक्रम : राजाभाऊ सरवदे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



अक्कलकोट /प्रतिनिधी रिपब्लिकन पक्ष(आठवले) च्या माध्यमातून बोरोटी गावचे सुपुत्र बाबुशेठ कांबळे यांच्या गरीब व गरजू लोकांना जिवनावष्यक कादिवाळी किट वाटप करणे हे बाबुशेठ अर्जुन कांबळे यांच्या स्तुत्य व काळाची गरज असल्याचे प्रतिपादन रिपाई (आठवले)चे प्रदेश अध्यक्ष तथा राज्याचे आजी राज्यमंत्री राजाभाऊ सरवदे यांनी व्यक्त केली आहे.

अक्कालकोट तालुक्यातील बोरोटी बु. येथे महाराष्ट्रात सध्या सर्वत्र दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीत गोर गरीब लोकांची दिवाळी गोड व्हावी या उद्देशाने बोरोटी गावचे उद्योजक बाबू शेठ कांबळे यांच्या वतीने रिपाइंचे प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या हस्ते ३२५ लोकांना दिवाळी फराळाचे साहित अविनाश मडिखांबे, सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदापा झळकी, अक्कलकोट शहर अध्यक्ष अजय मुकणार, युवक तालुकाध्यक्ष आप्पा भालेराव, युवक जिल्हा सरचिटणीस विजय पोतेनवरू , हवेली तालुका अध्यक्ष तथा बोरोटी बु चे माजी सरपंच सिध्दु भाऊ कांबळे, मोतोश्री शकुंतला कांबळे, रिपाइं बंजारा क्रांती दलाचे तालुका अध्यक्ष लालसिंग, मुबारक नाईकवाडी, निंगप्पा गायकवाड, चव्हाण, तालुका उपाध्यक्ष अंबादास गायकवाड, चंद्रकांत गायकवाड, शहर सरचिटणीस शुभम मडिखांबे, बबलाद गावचे सरपंच बाबुराव निरगुडे, संदीप गायकवाड, प्रकाश गडगडे, उत्तम गायकवाड, तम्मा दसाडे, गोरखनाथ धोडमनी, हणमंत कांबळे, राजु कांबळे, पुंडलिक शिंगे, निंगप्पा निंबाळ, रमेश धोडमनी, कोतली सर रुध्देवाडी खाजप्पा बनसोडे, महेदिमिया जिडगे, राहुल गजधाने तसेच दुधनी, रुध्देवाडी, आंदेवाडी(ज), बबलाद, बोरोटी(बु), बोरोटी(खु), तळेवाड, आणी संगोगी(ब) गावचे ग्रामस्थ व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

पंढरपूर नगरपालिकेच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल जयंती व स्वर्गीय इंदिराजी गांधी पुण्यतिथी निमित्त उत्साहात साजरी



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/पंढरपूर

पंढरपूर नगरपरिषदेत लोकनियुक्त नगराध्यक्ष प्रणिता भगीरथ भालके यांनी सरदार वल्लभाई पटेल जयंती व स्वर्गीय इंदिराजी गांधी पुण्यतिथी निमित्त अभिवादन!

पंढरपूर नगरपरिषदेमध्ये भारताची लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करून देशाची एकता अखंडते साठी त्यांनी दिलेल्या अतुलनीय योगदानाचे स्मरण करण्यात आले. तसेच भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय इंदिराजी गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करून देशाच्या उभारणीत त्यांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. दोन्ही महान व्यक्तिमत्त्वाची राष्ट्र सेवेतील कार्य, उद्या आणि देशप्राप्ती असलेली निष्ठा सदैव प्रेरणादायी राहील सरदार वल्लभाई पटेल यांना जयंती निमित्त विनम्र अभिवादन! स्वर्गीय इंदिराची गांधी यांना पुण्यतिथीनिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली!

यावेळी पंढरपूर नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष प्रणिता भगीर भालके, नगरपालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, नगरसेवक ओंकार जोशी, इत्यादी उपस्थित होते.

राष्ट्रीय अध्यक्ष संदिप जाधव आणि महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष किशोर दादा पवार यांची केंद्र व राज्य सरकारकडे ठोस कायदेशीर संरक्षणाची मागणी

पत्रकारितेच्या स्वातंत्र्यासाठी लोकशाही पत्रकार महासंघ भारत आक्रमक; डीपीडीपी कायद्यात पत्रकारांना संरक्षण देण्याची मागणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई/प्रतिनिधी



डिजिटल युगात वैयक्तिक माहितीचे संरक्षण करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच लोकशाही व्यवस्थेत पत्रकारितेचे स्वातंत्र्य आणि जनतेचा माहिती जाणून घेण्याचा अधिकार सुरक्षित ठेवणेही आवश्यक आहे. मात्र, केंद्र सरकारच्या डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायदा (ऊळसळींरश्र झशींपरश्र ऊींर झींशलींळेप लीं, २०२३) आणि त्याअंतर्गत लागू करण्यात आलेल्या नियमांमुळे पत्रकारिता, विशेषतः शोध पत्रकारितेसमोर निर्माण होऊ शकणाऱ्या कायदेशीर आणि व्यावहारिक अडचणींचा मुद्दा आता चर्चेत आला आहे. या पार्श्वभूमीवर लोकशाही पत्रकार महासंघ भारताचे राष्ट्रीय अध्यक्ष संदिप जाधव आणि महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष किशोर दादा पवार यांनी पत्रकारितेला स्पष्ट कायदेशीर संरक्षण देण्याची ठाम मागणी केली आहे.

भ्रष्टाचार, शासकीय अनियमितता, आर्थिक गैरव्यवहार, सत्तेचा गैरवापर आणि जनतेच्या हिताशी संबंधित गंभीर विषय उघडकीस आणणे ही पत्रकारितेची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. अशा बातम्यांसाठी पत्रकारांना विविध कागदपत्रे, डिजिटल नोंदी, छायाचित्रे, व्हिडिओ, सार्वजनिक माहिती आणि गोपनीय सूत्रांकडून मिळणाऱ्या माहितीचे संकलन व पडताळणी करावी लागते. मात्र, वैयक्तिक माहितीच्या वापरासंबंधीच्या कायदेशीर तरतुदींचा परिणाम या प्रक्रियेवर होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त होत आहे.



विशेषतः एखाद्या प्रभावशाली व्यक्तीविरोधात भ्रष्टाचाराची बातमी प्रसिद्ध करताना संबंधित व्यक्तीची संमती घेणे आवश्यक ठरल्यास शोध पत्रकारितेच्या कामकाजात अडथळे निर्माण होऊ शकतात. पत्रकारांना माहिती पुरवणाऱ्या गोपनीय सूत्रांची ओळख उघड होण्याची भीती, प्रकाशित बातम्या हटविण्यासाठी येणाऱ्या मागण्या, डिजिटल अभिलेखांचे संरक्षण आणि पत्रकारांच्या माहिती संकलनाच्या अधिकारांबाबतही स्पष्टता आवश्यक आहे.

उच्चउच्च कायद्याच्या कलम १७ मध्ये काही विशिष्ट अपवाद दिलेले आहेत; मात्र जनहितासाठी केल्या जाणाऱ्या पत्रकारितेसाठी स्वतंत्र सर्वसाधारण सवलत स्पष्टपणे नमूद केलेली नाही. त्यामुळे पत्रकार, संपादक, वृत्तसंस्था आणि स्वतंत्र डिजिटल पत्रकारांसाठी स्वतंत्र व मर्यादित कायदेशीर संरक्षण असावे, अशी भूमिका महासंघाने मांडली आहे.

लोकशाही पत्रकार महासंघ भारताचे राष्ट्रीय अध्यक्ष संदिप जाधव आणि महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष किशोर दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली महासंघाने या विषयावर शासनाचे लक्ष वेधण्याची भूमिका घेतली आहे. पत्रकारांचे हक्क, पत्रकारितेचे स्वातंत्र्य आणि जनतेचा माहिती जाणून घेण्याचा अधिकार यांचा समतोल राखण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने आवश्यक कायदेशीर उपाययोजना कराव्यात, अशी दोघांची ठाम मागणी आहे.

या मागण्यांसंदर्भात लोकशाही पत्रकार महासंघ भारताच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि मुख्य सचिव यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारकडे या विषयावर ठोस शिफारस करावी, अशी मागणी राष्ट्रीय अध्यक्ष संदिप जाधव आणि प्रदेशाध्यक्ष किशोर दादा पवार यांच्यासह राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रतापराव साळुंखे, राष्ट्रीय उपाध्यक्ष निवृत्त न्यायाधीश डॉ. संतोषकुमार जयस्वाल, राष्ट्रीय महामंत्री टी. माधव, सरचिटणीस हलीमाताई शेख, संघटनमंत्री ज्ञानेश्वरजी बुधवंत, ड. रमाकांत पाटील आणि डिजिटल मीडिया अध्यक्ष महेबूब शेख या महासंघाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने पत्राद्वारे केली आहे.

वैयक्तिक माहितीचे संरक्षण आणि पत्रकारितेचे स्वातंत्र्य हे परस्परविरोधी विषय नाहीत. नागरिकांच्या गोपनीयतेचा आदर राखतानाच जनहितासाठी सत्य शोधणाऱ्या पत्रकारांना आवश्यक कायदेशीर संरक्षण मिळणे गरजेचे आहे. पत्रकारितेच्या नावाखाली कोणालाही गोपनीयतेचा भंग करण्याची अमर्याद मुभा मिळू नये; परंतु कायद्याच्या अंमलबजावणीमुळे भ्रष्टाचार, गैरव्यवहार आणि जनहिताचे प्रश्न मांडणाऱ्या पत्रकारांचा आवाजही दबला जाऊ नये.

पत्रकारांचे न्याय्य हक्क, शोध पत्रकारितेचे स्वातंत्र्य आणि लोकशाहीतील पारदर्शकता यांचे संरक्षण करण्यासाठी लोकशाही पत्रकार महासंघ भारत कटिबद्ध असून, या विषयावर राष्ट्रीय स्तरावर संघटित पाठपुरावा करण्याची भूमिका राष्ट्रीय अध्यक्ष संदिप जाधव आणि महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष किशोर दादा पवार यांनी घेतली आहे.